18-19

ISSN 2320 - 4494
RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Resarch Journal
Volume : II Issue : II July to Sept.- 2018



ARTS | COMMERCE | SCIENCE | AGRICULTURE | EDUCATION | MANAGEMENT | MEDICAL | ENGINEERING & IT | LAW | SOCIAL SCIENCES | PHYSICAL EDUCATION | JOURNALISM | PHARMACY

Editor
**Sarkate Sadashiv Haribhau**
Email : powerofknowledge3@gmail.com, shsarkate@gmail.com

Principal
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

Power of Knowledge Peer Review Journal, Volume : II, Issue : II, July to Sept. - 2018 ISSN 2320-4494

# अनुक्रमणिका (Index)



| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 1 | VIOLENCE AGAINST WOMEN & GIRLS | Dr. Mohamad Mustafa A. Mujawar Nadwi | 1 |
| 2 | INDIAN IMAGES IN NISSIM EZEKIEL'S POETRY | Dr.Subhash S. Waghmare | 5 |
| 3 | Dr. Babasaheb Ambedkar Important Suggestion for Reservation for Sheduled Castes and Adivasi Tribes | Prakash Kharat | 8 |
| 4 | MODES OF IRRIGATION IN BEED DISTRICT, A GEOGRAPHICAL STUDY | Mr. Usare Bharat Rupchand, | 11 |
| 5 | Experiment in Engaging men in Gender Equality | Dr. Arundhati Suryakant Patil | 15 |
| 6 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असलेली लोकशाही | प्रा. अरुण पडघन | 18 |
| 7 | मानव संसाधन विकास : सैध्दांतिक विवेचन | फुलारी ज्योती | 22 |
| 8 | बाबासाहेबांचे वाचन : एक वेध | डॉ. लक्ष्मण गीते | 27 |
| 9 | मराठी ग्रामीण कथेतील सहकाराचे चित्रण | प्रा. डॉ. बबन गायकवाड | 30 |
| 10 | दलित साहित्य : एक चिंतन | प्रा.लक्ष्मण गीते | 35 |
| 11 | आपत्ती व्यवस्थापन : आधुनिक काळाची गरज | प्रा. एकनाथ ज्ञानदेव खरात | 37 |
| 12 | महामानव नेल्सन मंडेला यांचे काव्यरूपाने दिसून येणारे चित्रण | डॉ. दादाराव गुंडरे | 42 |
| 13 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाही | प्रा.डॉ. रंदिल गजेंद्र साहेबराव | 46 |
| 14 | ओतारी समाजाचे लोकजीवन | ओतारी विक्रम अभिमन्यू | 48 |
| 15 | बदलत्या हमावानाचा भारतीय कृषीक्षेत्रावर परिणाम | प्रा.डॉ. देशमुख एस.बी. | 50 |
| 16 | नव्वदोत्तर स्त्रीवादी काव्य | प्रा. रेखा व्ही. इंगोल | 53 |
| 17 | 'आदिवासींच्या विकास योजना व दिशा "<br>(20 वे शतक) नाशिक | श्री. जी. डी. रुपवते | 58 |
| 18 | माळव्यातील धार व देवास संस्थानाची प्रशासकीय व्यवस्था | प्रा.डॉ.सुनिल रजपूत | 60 |
| 19 | चारमीनार एक सुंदर आणि आकर्षक इमारत | प्रा. डॉ. शेख कलीम मोहियोद्दीन | 64 |
| 20 | आदिवासी लेखकांनी लिहिलेले साहित्य : स्वरुप व विचार | प्रा. डॉ. जगतवाड शिवाजी पिराजी | 66 |
| 21 | अण्णाभाऊ साठे यांचे कादंबरी लेखन : आशय आणि वेगळेपण- काही निरीक्षणे | प्रा. डॉ. सोपान माणिकराव सुरवस | 69 |
| 22 | लीळाचरित्र : एक श्रेष्ठ वाङ्मयीन कलाकृती | डॉ. सौ. जयदेवी पवार | 75 |



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

Power of Knowledge Peer Review Journal, Volume : II, Issue : II, July to Sept. - 2018 ISSN 2320-4494

# माळव्यातील धार व देवास संस्थानाची प्रशासकीय व्यवस्था

प्रा.डॉ.सुनिल रजपूत
इतिहास विभाग,
जवाहर महाविद्यालय, अणदूर
ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद

प्रस्तावना :-

मराठ्यांच्या इतिहासात माळवा प्रांतातील धार व देवास येथील पवार घराण्याने व संस्थानाने राज्यविस्ताराच्या दृष्टीने केलेली कामगिरी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. परंतु पवार घराण्याचा, संस्थानाचा प्रशासकीय इतिहास दुर्लक्षित असून महाराष्ट्रास व संपूर्ण भारतास धार व देवास येथील पवार संस्थानाचा इतिहास फारसा ज्ञात झालेला नाही.

माळवा म्हणजे भारताचा केंद्रबिंदू आणि शेतीच्या उत्पादनाचा वैभव संपन्न प्रदेश. यामुळे या प्रांताने इतिहास काळात आपले विशिष्ट महत्त्व प्रस्थापित केले होते. दिल्लीचे सुलतान, मोगल सम्राट व मराठे ह्या सर्वांनाचा रसद उपलब्ध करून देण्यास माळव्याचा प्रदेश हा दुवा म्हणून मानला जात होता. मल्हारराव होळकर, उदाजीराव पवार व राणोजी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली माळवा प्रांत येथील मराठ्यांनी त्या प्रांताची वसाहत वाढविण्याचे व पडीक जमिनी लागवडी खाली आणण्याचे विशेष प्रयत्न केले.

देवासचे सरकारने आखून दिलेली शासनपध्दती माळवा प्रांतात चालू होती. परंतु वरील शासनपध्दती कायम ठेवून त्यामध्ये आवश्यक त्या-त्या सुधारणा केल्या गेल्या. जमीन महसूलाचे दर योग्य प्रमाणात कमी केले आहे.

❖ विषयाची निवड :-

माळवा प्रांतातील धार व देवास येथील पवार घराण्यातील सरदारांनी मराठा स्वराज्य विस्तारासाठी इ.स.१८१८ पर्यंत मोलाची कामगिरी केली आहे. छत्रपती शाहू महाराजांच्या काळात (१७०८-१७४९) स्वराज्य विस्ताराच्या दृष्टीने उत्तरेच्या मध्यप्रदेशातील धार व देवास येथे पवार घराण्यातील सरदारांनी संस्थान स्थापन करून मराठा राज्याच्या विस्तारासाठी या घराण्यातील सरदारांनी अभूतपूर्व कामगिरी केली. परंतु धार व देवास पवार संस्थानाचा इतिहास मराठी - स्वराज्याच्या दृष्टीने दुर्लक्षित राहिला होता. यासाठी "माळव्यातील धार व देवास संस्थानाची प्रशासकीय व्यवस्था" या विषयाची निवड केली आहे.

❖ विषयाचा उद्देश :-

१) धार व देवास पवार संस्थानाची प्रशासकीय व्यवस्था कशी होती. याचा अभ्यास करणे

२) माळव्यातील धार व देवास संस्थानाचे प्रशासकीय संघटन अभ्यासणे

३) माळव्यातील धार व देवास संस्थानाची प्रशासकीय व्यवस्थेमुळे मराठ्यांचे माळव्यातील राज्य स्थिर राहिले का ? याचा अभ्यास करणे.

❖ संशोधन पध्दती :- प्रस्तुत विषयासाठी संदर्भ संशोधनाचा उपयोग केला आहे. त्यामध्ये प्राथमिक, अप्रकाशीत साधने, मुद्रित कागदपत्रे व दुय्यम संदर्भ ग्रंथांचा वापर केला आहे. प्राथमिक व दुय्यम संदर्भ ग्रंथाद्वारे प्रशासकीय माहितीमध्ये संतुलन साधण्याचा प्रयत्न केला आहे.



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

❖ **प्रशासकीय व्यवस्था :-** माळव्यातील धार व देवास संस्थानाचे प्रशासकीय संघटन हे एक आव्हान होते. कारण हा प्रदेश मराठ्यांच्या शासकांना नवीन होता. आणि या प्रदेशातील जुन्या अधिका-यांच्या ताब्यातील प्रदेश मराठ्यांनी आपल्या ताब्यात घेतल्यामुळे ते सुध्दा मराठा प्रशासकांच्या विरूध्द होते. एथदेशीय अधिका-यांच्या संमतीशिवाय जमीन महसूल शेतक-यांकडून वसूल करणे अवघड बाब होती. या समस्यांना तोंड देण्यासाठी माळव्यातील मराठ्यांच्या प्रशासकांनी माळव्यातील बिगर मराठा प्रशासकांच्या तुलनेत चोख तसेच स्थानिक अधिकारी आणि रयतेस अनुकूल व आदर्श राहील अशी प्रशासकीय व्यवस्था निर्माण केली. त्यामुळे त्यांचे प्रशासकीय संघटन आदर्शवत ठरले. केवळ प्रशासकीय व्यवस्थेमुळेच मराठ्यांचे माळव्यातील राज्य दीर्घकाळ स्थिर व लोकप्रिय गणले गेले.[१] माळव्यातील मराठ्यांची प्रशासकीय संघटन व व्यवस्था खालील प्रमाणे होती.

❖ **प्रधान :-** धार व देवास संस्थानाच्या प्रशासनातील प्रधान हा मराठी सरदारांचा माळव्यातील मुख्य सल्लागार आणि सहाय्यक मानला जात होता. प्रधानाची नियुक्ती सरदार स्वतःच करीत असे. प्रधान त्या राज्याचा प्रमूख सेनापतीही असे.

प्रधानाचे कार्य मुख्यतः राजनैतिक होते. प्रधानाचा पेशवे दरबारात सुध्दा सरळ संबंध राहत होता. देशदिवाण आणि मराठ्यांच्या सरदारात मतभेद निर्माण झाल्यास प्रधानाची मध्यस्थी महत्वाची समजली जाई. [२]

❖ **देशदिवाण -** राज्यात प्रधानानंतर सर्वाधिक महत्वपूर्ण व सर्वोच्च प्रशासनपद म्हणजे देशदिवाणांचे असे. त्याला देश हकीम आणि देशदिवाण असे म्हटले जात असे.

❖ **तनदिवाण (राजस्व अधिकारी ) :-** माळव्यातील मराठा सरदारांना साम्राज्य विस्तारासाठी बराच वेळ राज्याच्या बाहेर राहावे लागत असे. त्यामुळे अंतर्गत राज्य व्यवस्थेसाठी द तनदिवाण द यांची नियुक्ती करावी लागत असे. इतकेच नव्हे तर प्रशासनाच्या व्यवस्थेत तनदिवाणाचे महत्व असे. देशदिवाण आणि तनदिवाणांच्या परस्पर संबंधामुळे राज्यकारभार सुरळीत चालत असे. तनदिवाण राजाचा विश्वासपात्र सेवक म्हणून समजला जात असे.

❖ **कानुंगो -** हा परगण्यातील एक महत्वपूर्ण अधिकारी होय. हे पद वंशपरंपरागत असे. तोच परगण्याविषयी विविध प्रकारची माहिती देत असे. जमिनीसंबंधीचे वादविवाद कानुंगोच्या कार्यालयातूनच सोडविले जात असे. परगण्यात पोतदार, खजिनदार, चौधरी, सिकंदर इत्यादी अन्य अधिकारी असत.[३]

❖ **धार व देवास संस्थानातील जमिन महसूल राजस्व व्यवस्था : -**

राज्यातील जमीन महसूल व्यवस्थेच्या दृष्टीने जमिनीचे तीन भागात विभाजन करण्यात येत होते. खालसा व्यवस्था, जहागीर आणि दानभूमी, शासनभूमी. शासक आपल्या राज्याच्या क्षेत्रातील अधिकांश भाग राज्याच्या जमीनदारांना पगाराच्या मोबदल्यात जहागीर म्हणून देत असे. असा जहागिरीचा व दानभूमीचा प्रदेश सोडून बाकीचा भाग राज्याच्या नियंत्रणाखाली येत असे. त्यास खालसा व्यवस्था असे म्हणत. खालसा गांवाची जमीन शेतकरी कसत असत. त्या जमीनीचा महसूल सरळ राज्याच्या तिजोरीत जात असे. मराठ्यांच्या अगोदर माळव्यात ठाकूर आणि मंडलोईचा प्रभाव होता. परंतू त्यावेळी खालसा भूमी कमी होती. मराठ्यांच्या कारकिर्दीत खालसा भूमीचे क्षेत्रफळ राजाच्या व्यक्तीगत स्वभाव विशेषावरही अवलंबून असे.[४]

❖ **जमीन महसूलाच्या पध्दती :-**

माळव्यात जमीन महसूल वसूल करण्याच्या अनेक पध्दती प्रचलीत होत्या. त्या पुढीलप्रमाणे होत्या.



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

**१) बटाई -** या पध्दतीनुसार शेतातील पिकांचे वजन न करता केवळ अनुमान पध्दतीने धान्यांचे समान भाग करून हिस्से दिले जात होते. व एक हिस्सा राज्याच्या गोदामात जमा केला जात होता.

**२) चौथाई-सरदेशमुखी : -** शिवभारत ग्रंथात नमूद केल्या प्रमाणे शिवाजी महाराजांनी लष्करात बेबनाव होऊ नये म्हणून लष्करातील अधिका-यांना त्यांनी चौथाई - सरदेशमुखीचे अधिकार दिलेले नव्हते. इतिहासकार एस.एन.सेनच्या मते - मराठा सरदारांना छत्रपती शिवाजी महाराजानंतर चौथ व सरदेशमुखीचे अधिकारी बहाल करण्यात आले होते. ही पध्दत पेशवा बाळाजी विश्वनाथ यांच्या कारकिर्दी पासून सुरू झाली. माळवा प्रांतात होळकर, शिंदे ,पवार यांना चौथाई सरदेशमुखीचे अधिकार देण्यात आलेले असून स्वराज्याच्या व्यतिरिक्त राजस्थान व उत्तरेकडील प्रदेशात आक्रमण केल्यानंतर मराठा सरदारांना चौथाईचे अधिकार म्हणजे उत्पन्नाचा १/४ भाग मराठा सरदारांना देण्यात येत असून उत्पन्नाचा १/१० भाग सरदेशमुखी म्हणून देण्यात आला. त्यांनी चौथाई सरदेशमुखीच्या मोबदल्यात ज्या भागाची चौथाई, सरदेशमुखी घेतली असेल त्या भागाच्या संरक्षणाची जबाबदारी त्यांच्यावर टाकण्यात आली. त्यामुळे आपोआपच मराठे सरदार हे चौथाई, सरदेशमुखीमुळे स्वराज्य ऐवजी परप्रांताच्या हिताचे संरक्षण करू लागले ही बाब स्वराज्याच्या हिताच्या दृष्टीने योग्य नव्हती

चौथाई , सरदेशमुखी व जहागीरदारीच्या पध्दतीमुळे मराठे सरदारांना जमिन महसूलाचे उत्पन्न वाढल्यामुळे त्यांना विविध प्रदेशात जमिन महसूलासंबंधी आपल्या स्थानिक दिवाणांची व इजारेदार अधिका-यांची नियुक्ती केली. यातूनच मराठे सरदारांचा स्वराज्याचा दृष्टीकोन बदलला. म्हणून चौथाई , सरदेशमुखी ही मराठ्यांच्या राज्यविस्ताराच्या दृष्टीने कायदेशीर बाब असली तरी हिंदवी स्वराज्य हे इमाने-इतबारे, बाणेदारपणे चालविण्यास कमकुवत बनले. [६]

**३) इजारेदार पध्दत :-** पुण्यातील पेशव्यांनी माळवा प्रदेशातील मराठे सरदारांना चौथाई, सरदेशमुखी दिली होती. मराठा सरदारांनी आपल्या अंतर्गत प्रांतात जमिन महसूल वसूल करण्याकरिता जे नायक दिवाण नेमले जात व त्यांच्याकडून जो जमिन महसूल वसूल केला जात असे त्यास इजारेदार पध्दत असे म्हणतात.

**४) मोकासा -** इ.स.१७१९ मध्ये मोगल बादशहाने छत्रपती शाहू यांना चौथाई, सरदेखमुखीच्या सनदा करून दिल्या, त्याअन्वये मोगली मुलखातून मुळ वसुलावर शेकडा २५ टक्के चौथाई व शेकडा १० टक्के सरदेशमुखी वसूल करीत. याबद्दल शाहू महाराजांनी १५ हजार फौज ठेवून मोगल सुभेदारास मदत करावी व दरसाल १० लक्ष खंडणी बादशहास द्यावी. या चौथाई वसूलाच्या एकंदर रकमेतून

राजबाबती म्हणून राजाच्या खर्चास द्यावा. बाकीचा राहिल त्यापैकी साहोत्रा ६ टक्के व नाडगौडा ३ टक्के वजा करून वसूलाची बाकी ६६ टक्के राही त्यास मोकासा म्हणत . हा भाग निरनिराळया सरदारास जहागिरीदाखल वाटून देण्यात येत असे उत्पन्नाचा १/१६ भाग मोकासा घेण्याची पध्दत मराठ्यांच्या शासन प्रमाणित होती .[७]

**५) जब्ती : -** कापूस,अफू , भाजीपाला , टरबूज व विविध फळभाज्यांच्या उत्पन्नाचा प्रत्येक बिघ्याचा हिशोब करून जो कर घेतला जात असे, त्यास जब्ती असे म्हणत. हा कर नगदी स्वरूपात वसूल केला जात असे. धारच्या राज्यात जब्ती कर उत्पन्नाच्या १/४ हिस्सा म्हणून वसूल केला जात असे. तसेच जमिन महसूल धान्याच्या रूपाने गोळा करणा-या कमाविसदारांचा खर्च त्या-त्या परगण्यातील सर्व शेतक-यांना द्यावा लागत असे. [८]

**६) दान : -** जर एखाद्या व्यापा-याने बाहेरून घोडा किंवा कोणताही प्राणी माळव्यात आणला तर त्या प्राण्यावर जो कर द्यावा लागत असे त्यास ६ दान ६ कर असे म्हटले जाई. जो प्राणी माळव्यातील राज्यात विकला जात असे त्यावर ६दान ६ च्या



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

शिवाय काही विक्रीकर सुध्दा द्यावा लागत असे.

❖ निष्कर्ष :-

१) माळवा प्रांतात पेशवे सरकारने आखून दिलेलीच शासन पध्दती कायम होती.

२) मराठ्यांनी माळव्यात आर्थिक स्थिरतेसाठी केलेली महत्वाची सुधारणा म्हणजे जमिन महसूल पध्दत होय.

३) मराठ्यांनी माळवा प्रांत काबीज केल्यावर थोडा फेरफार करून तीच शासनपध्दती कायम ठेवली.

४) मराठे सरदार व प्रशासकांना वैयक्तिक महत्वाकांक्षा होती.

५) धार व देवास पवार संस्थानातील सरदारांनी लोकाभिमुख प्रशासन देण्याचा प्रयत्न केला.

**समारोप :-** मराठ्यांचे राज्य वाढवून चोख प्रशासनाद्वारे साम्राज्याचे स्वरूप प्राप्त होण्यास ज्या कर्त्या घराण्याचे परिश्रम उपयोग पडले त्यात धारकर व देवासकर पवार या मराठ्यांच्या घराण्याची प्रामुख्याने गणना केली जाते. मराठे सरदारांना, प्रशासकांना वैयक्तिक महत्वाकांक्षा होती. यात शंका नाही. त्याचप्रमाणे त्यांना स्वत : विचार करण्याची सवय असल्यामुळे वेळ पडेल तेंव्हा स्वत:च्या अंगावर काम घेऊन यश मिळवून पराक्रम गाजविण्याची त्यांना हौस होती. मराठे सरदार महत्वाच्या प्रसंगी आपसातील मतभेद विसरून ऐक्याने वागताना दिसतात. विविध लढायांची हकीकत लक्षात घेतली असता त्यावेळच्या मराठा सरदारांना आणीबाणीच्या प्रसंगी एकजुटीने वागण्याची बुध्दी सूचत होती हे नि:संशयपणे सत्य आहे. परंतू ब-याच वेळा युध्द व इतर मोहिमांमध्ये या घराण्यातील सरदारांना वेळ घालावावा लागला त्यामुळे मराठी राज्याचा विस्तार करता आला. ही त्यांची जमेची बाजू होय. या युध्दमोहिमांच्या धामधुमीत त्यांना प्रशासकीय व्यवस्थेमध्ये म्हणावे तसे कार्य करता आले नाही. तरीसुध्दा लोकाभिमूख प्रशासन देण्याचा प्रयत्न पवार घराण्यातील अनेक सरदारांनी केला. असे म्हणता येईल.

**संदर्भ सूची -**

१) डॉ. लुणिया बी.एस.- मराठा प्रभूत्व ( हिंदी )

२) जेरेटी - आईन ए अकबरी भाग- २ पू.२०७

३) सेंट्रल इंडिया एजन्सी रिपोर्ट १८६६-६७ पृ.११

४) कित्ता, पृ.२४

५) गो.स. सरदेसाई- पेशवे दप्तर, खंड २५ पृ.१४४-१४९, राजवाडे - मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड ३ पृ.४१५ , सेन.एस.एन.मराठा ॲडमिनिस्ट्रेशन , पृ.२२४-२२६

६) डॉ.रघुवीर सिंह - माळवा इन ट्रान्झीशन, पृ.३२७

७) धारकर पवार इतिहासाची साधने, पृ.४ तळटीप

८) वंशभास्कर, पृ.११,२९१

❑ ❑ ❑



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.